जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

# दैनंदिन गुन्हयांची प्रेसनोट

## पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर
## प्रेस नोट दि.२४/०३/२०२४
## दि.२३/०३/२०२४ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | चतु:श्रृंगी पो स्टे.२६०/२०२४,भादविक ३९२,३२३,५०४,३४ |
| **फिर्यादी** | एक इसम वय ४० वर्षे, रा.बाणेर पाषाण रोड पुणे |
| **आरोपीत** | मोटार सायकलवरील चार अनोळखी इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक २३/०३/२०२४ रोजी रात्री ०१/४० ते ०१/५० वा.चे.सुमारास आयसीआसीआय बॅकेचे समोर पाषाण सुस रोडवर पुणे.येथे |
| **तपशिल** | वर नमुद केले ता.वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी त्यांचे दाजी व नातेवाईक असे तिघे जण दोन मोटार सायकल वरून जात असतांना अनोळखी तीन मुले त्यांचे ताब्यातील ॲक्टीवा मोटार सायकल ही वेडी वाकडी चालवत होते. म्हणुन त्यांना गाडी व्यवस्थीत चालवा असे सांगितले असता त्यांचा राग आल्याने त्यांनी त्यांचे मित्रास तेथे बोलावुन फिर्यादी,दाजी व नातेवाईकास लाथा बुक्याने मारहाण करून दगड मारण्याचा प्रयत्न केला तसेच सदर भांडणाच्या वेळी फिर्यादी यांचे गळयातील २,००,०००/- रु.किंमतीची सोन्याची चैन जबरदस्तीने काढुन घेवुन गेले आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी.नरेंद्र पाटील मो.नं.९०११७१९१०० |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | लोणीकंद पो स्टे.२७५/२०२४,भादविक ३०६ |
| **फिर्यादी** | मोहन मते वय ४७ वर्ष रा.नाशिक |
| **आरोपीत** | पती,सासु व नणंद (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक २२/०३/२०२४ रोजी दुपारी १२/३० वा.चे.सुमारास फ्लॅट नं.५०४ ऐश्वर्या लक्ष्मी सोसायटी वाघोली ता.हवेली जि.पुणे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांची मुलगी नामे प्रिती संजय शिंदे हिचे लग्न तीचा पती संजय शिंदे याचे बरोबर दिनांक १९/१२/२०२१ रोजी होवुन,ती सासरी नांदत असताना,लग्नानंतर दोन-तीन महीन्या पासुन ते दि.२२/०३/२०२४ रोजी पर्यत यातील नमुद इसम पती,सासु रा.सदर व नणंद रा.नाशिक यांनी तिचा शारिरीक व मानसिक छळ करून मारहाण करुन वर नमुद केले ता.वेळी व ठिकाणी,राहते घराचे बेड रुममध्ये छताच्या फॅनला ओढणीच्या साहयाने गळफास घेवुन आत्महत्या करण्यास प्रवृत्त केले. |
| **त.अंमलदार** | म.सहा.पो.निरी.वंजारी मो.नं.९०४९६४५९५९ |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | पर्वती पो स्टे.१२४/२०२४,भादविक ४२० |
| **फिर्यादी** | योगेश जगताप वय ३७ वर्षे रा.उरुळी कांचन पुणे |
| **आरोपीत** | वारीस रती खान वय ३१ वर्षे रा.गाव पिपरोली,तहसिल पुन्हाना,जि.महु हरियाणा राज्य(अटक) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक २३/०३/२०२४ रोजी दुपारी १२/१५ ते १२/३० वा.चे सुमारास दि पंढरपुर अर्बन को-ऑफ बॅक लि.पंढरपुर शाखा सिंहगडरोड पुणे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी सदर बॅकेत अधिकारी म्हणुन नोकरीस असुन यातील नमुद इसम वारीस रती खान वय ३१ वर्षे रा. गाव पिपरोली, तहसिल पुन्हाना, जि. महु हरियाणा राज्य याने वर नमुद |

| | |
|---|---|
| | वेळी व ठिकाणी बॅकेच्या एटीएम मधुन पंजाब नॅशनल बॅकेचे डेबीट कार्ड चे साहयाने ९,५०० रुपये काढुन घेत असताना अनाधिकाराने डयुप्लीकेट चावीचा वापर करुन मशीन चे स्क्रीन उघडुन झालेल्या ट्रान्झीक्शन लपवण्यासाठी मशीन काही वेळेसाठी बंद करुन बॅकेची ९,५०० रु.ची फसवणुक केली आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी.सुनिल जगदाळे,मो.नं.९६५३६९३६१२ |
| **४** | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | शिवाजीनगर पो स्टे.७४/२०२४,भादविक ४१९,४२०,१७०,३४ आय.टि.ॲक्ट ६६ डी |
| **फिर्यादी** | एक इसम वय ५० वर्ष रा.चतुःश्रुंगी,पुणे |
| **आरोपीत** | मोबाईल धारक व वापरकर्ता,Mumbai Crime Branch असे प्रोफाईल असलेल्या व त्यावर मुंबई पोलीसचा लोगो असलेला स्काईप युझर,विविध बँकेचे खाते धारक व वापरकर्ते (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | ऑनलाईन माध्यमाव्दारे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांना यातील मोबाईल धारक व वापरकर्ता, व Mumbai Crime Branch असे प्रोफाईल नाव असलेला व आयडी व त्यावर मुंबई पोलीसचा लोगो असलेला स्काईप युझरने फेडेक्स कुरीयर कंपनीतुन व पोलीस असल्याचे बतावणी करुन फिर्यादी यांचे नावाने मुंबई ते तैवान पाठवण्यात आलेले पार्सल परत आले आहे.असे सांगुन त्यामध्ये पाच पासपोर्ट,तीन बँके चे क्रेडीट कार्ड,२०० ग्रॅम एम.डी.एम.ए. ३५०००/- रु.कॅश व एक लॉपटॉप अशा वस्तु मिळुन आल्या आहे असे सांगुन फिर्यादी यांचा विश्वास संपादन करुन फिर्यादी यांचे नाव व आधारकार्ड,बँकखाती,मनी लॉंडरींग,ड्रग टॅफिकिंग,आयडेन्टीथेफ्ट करीता वापरली जात आहे असे सांगुन,बँक खात्याचे फायनासीअल व्हेरीफीकेशन करायचे आहे असे सांगुन बँक खात्यामधील रकमा फिर्यादी यांचे खात्यांचे व्हेरीफिकेशन होईपर्यंत सरकारी बँक खात्यामध्ये ठेवाव्या लागतील असे सांगुन १०,१,३००००/-रू विविध बँक खाते मध्ये ट्रान्सफर करण्यास सांगुन त्यानंतर त्यांना ट्रान्सफर केलेल्या रकमा परत न देता फिर्यादी यांची फसवणुक केली. |
| **त.अंमलदार** | पो.निरी.अनिल माने मो.नं.९१३००१२००५ |
| **५** | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | हडपसर पो स्टे.५२०/२०२४,भादविक ४२०,३७९ |
| **फिर्यादी** | एक महिला वय ६५ वर्षे, रा.पिंपळे सौदागर,पुणे |
| **आरोपीत** | एक अनोळखी महिला (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक २२/०३/२०२४ रोजी सायंकाळी १८/०० वा.च्या सुमारास हडपसर गाडीतळ ब्रिजजवळ, हडपसर, पुणे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हया हडपसर गाडीतळ ब्रिजजवळून पायी जात असताना एका अनोळखी महिलेने फिर्यादी यांना फिर्यादीची मुलगी व नंदावे यांची ओळख सांगुण रस पिण्यासाठी घेवून जावून चो-या होत असल्याचे कारण सांगुण गळ्यातील ७५,०००/- रुपये किंमतीचा सोन्याचा घंटन काढून घेवून पिशवित ठेवण्यासाठी सांगुण साडीमध्ये गुंडाळुन पिशवित ठेवत असल्याचे सांगुण हातचालाकी करून चोरी करून नेला आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.फौज.सुशिल लोणकर मो.नं.९७६७६८३०६१ |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**